धुळे महानगरपालिका

बाजार विभाग

ई लिलाव (E-Auction) सूचना क्र. 12 सन 2026-27

कामाचे नांव- मा. आयुक्त, धुळे महानगरपांलिकेमार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील भाजी मार्केट मार्केटमधील गाळा क्र. 1 ते 12, 15 ते 28, 31 ते 44 असे एकुण 40 पैकी निविदा फॉर्म मधील तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविले नुसार एकुण 17 गाळयांकरिता 10 वर्षासाठी भाडेपटटयाने / लिज पध्दतीने दयावयाचे असुन या गाळयांसाठी सर्वसाधारण व्यक्ती/संस्था लिलावात भाग घेऊ शकते अशा नोंदणीकृत संस्था/ व्यक्तींकडुन ई लिलाव पध्दतीने (E_Auction) एकत्रित प्रति गाळा दर मागविण्यांत येत आहे.

उपरोक्त ई लिलावाबाबतचा सविस्तर तपशिल https://eauction.gov.in या संकेतस्थळावर दि. 31/07/2026 सकाळी 11.00 वाजेपासुन पहावयास मिळेल.

Sd/-**

जा.क्र./ धुमपा/ बाजार विभाग/266/ 2026-27 — **उपायुक्त**

दिनांक - 28/7/2026 — **धुळे महानगरपालिका, धुळे**

जा.क्र./धुमपा/ रेकॉर्ड विभाग /127/ 2026-27

दि. 28/7/ 2026

प्रति

मा. संपादक **दै. लोकमत / आपलं नवराज्य**

उपरोक्त ई लिलाव (E-Auction) सुचना आपले दैनिकात कमीत कमी जागेत प्रसिध्दीस देऊन बिलासोबत अंकाच्या 5 प्रती इकडील कार्यालयास पाठविण्यात यावेत.

Sd/-*

सहा. आयुक्त

धुळे महानगरपालिका, धुळे

DHULE MUNICIPAL CORPORATION, DHULE.

E_AUCTION TENDER PAPER

कामाचे नांव- **मा. आयुक्त, धुळे महानगरपांलिकेमार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील भाजी मार्केट मार्केटमधील गाळा क्र. 1 ते 12, 15 ते 28, 31 ते 44 असे एकुण 40 पैकी निविदा फॉर्म मधील तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविले नुसार एकुण 17 गाळयांकरिता 10 वर्षासाठी भाडेपटटयाने / लिज पध्दतीने द्यावयाचे असुन या गाळयांसाठी सर्वसाधारण व्यक्ती/संस्था लिलावात भाग घेऊ शकते अशा नोंदणीकृत संस्था/ व्यक्तींकडुन ई लिलाव पध्दतीने (E_Auction) एकत्रित प्रति गाळा दर मागविण्यांत येत आहे.**

अ. क्र.	गाळा क्र.	एकुण 3 दुकानांचे एकत्रित क्षेत्रफळ (रेडिरेकनर दर 204 प्रती चौ.मी. महिना)	एकुण 3 दुकानांचे एकत्रित वार्षिक भाडे	3 महिन्याचे भाडे रक्कम अनामत रक्कम ना परतावा	आरक्षण
1	31,32	12.7	31090/-	7773/-	सर्वसाधारण

ई लिलाव प्रक्रियेतील निविदा संचाची फी (प्रति गाळा) (राष्ट्रीयकृत बँकेकडील डिमांड ड्राप्ट)	:	Rs. 2000/- (जीएसटी करासह) (दोन हजा मात्र विनापरतावा)
ई लिलाव प्रक्रियेत सहभागी होणेसाठी बयाणा रक्कम (राष्ट्रीयकृत बँकेकडील डिमांड ड्राप्ट) (प्रति गाळा)	:	25000/- (गाळा न मिळाल्यांस परतावा)
ऑनलाईन बोली (वाढीव मूल्य) Incremental Value	:	Rs. 10,000.00/-
Date of Issue – Publish Date	:	31/7/2026 : 11.00 am
Documents Submission/ Payment Start Date	:	31/7/2026 : 11.05 am
Documents Submission/ Payment End Date	:	20/8/2026: 11.00 am
Document/Payment Approval Start Date	:	21/8/2026: 11.05 am
Document/Payment Approval END Date	:	27/8/2026: 17.00 pm
EAuction Start Date	:	31/8/2026: 11:05 am
EAuction End Date	:	31/8/2026: 17.00 pm
Pre Bid Meeting		--

Name of AGENCY: ____

Agreement No. : __________________________

धुळे महानगरपालिका

बाजार विभाग

ई लिलाव (E-Auction) सूचना क्र. 12 सन 2026-27

मा. आयुक्त, धुळे महानगरपांलिकेमार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील भाजी मार्केट मार्केटमधील गाळा क्र. 1 ते 12, 15 ते 28, 31 ते 44 असे एकुण 40 पैकी निविदा फॉर्म मधील तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविले नुसार एकुण 17 गाळयांकरिता 10 वर्षासाठी भाडेपटटयाने / लिज पध्दतीने द्यावयाचे असुन या गाळयांसाठी सर्वसाधारण व्यक्ती/संस्था लिलावात भाग घेऊ शकते अशा नोंदणीकृत संस्था/ व्यक्तींकडुन **ई** लिलाव पध्दतीने (E_Auction) एकत्रित प्रति गाळा दर मागविण्यांत येत आहे. याबाबत तपशील https://eAuction.gov.in/eAuction/app या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अ. क्र.	कामाचा तपशिल	लिलावात भाग घेण्याकरिता निविदा फी	बोली अनामत
१	मा. आयुक्त धुळे महानगरपांलिकेमार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील भाजी मार्केट मार्केटमधील गाळा क्र. 1 ते 12, 15 ते 28, 31 ते 44 असे एकुण 40 पैकी निविदा फॉर्म मधील तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविले नुसार एकुण 17 गाळयांकरिता 10 वर्षासाठी भाडेपटटयाने / लिज पध्दतीने द्यावयाचे असुन या गाळयांसाठी सर्वसाधारण व्यक्ती/संस्था लिलावात भाग घेऊ शकते अशा नोंदणीकृत संस्था/ व्यक्तींकडुन ई लिलाव पध्दतीने (E_Auction) एकत्रित प्रति गाळा दर मागविण्यांत येत आहे.	रू. 2000/- जीएसटी करासह (विना परतावा) राष्ट्रीयकृत बँकेकडील डिमांड ड्राप्ट.	**25000/-** ह्या रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेकडील डिमांड ड्राप्ट (गाळा न मिळाल्यांस परतावा)

ई लिलाव वेळापत्रक

अ.क्र	मनपाची प्रक्रिया	कंत्राटदार प्रक्रिया	दिनांक व वेळ पासुन	दिनांक व वेळ पर्यंत
1	निविदा प्रक्रिया करणे.	--	दि. 31/7/2026 :10.00am	दि. 31/7/2026:11.00pm
2)	--	दस्तऐवज व डी. डी. ऑनलाईन अपलोड करण्याची मुदत.	दि. 31/7/2026:11.05am	दि. 20/8/2026:11.00 am
3)	--	Envelope No - 1 मधील दस्तऐवज व डी.डी. कार्यालयात स्विकारण्याची तारीख	**दि. 20/8/2026 :11.05am**	**20/8/2026 :17.00pm**
4)	प्राप्त दस्ताऐवज/ कागदपत्रे तपासणीचे कार्यालयीन कामकाज		दि. 21/8/2026 :11.05am	27/8/2026 :17.00pm
5)		**ऑनलाईन/ लाईव्ह ई लिलाव बोलीची तारीख व वेळ.**	**दि. 21/8/2026 :11.05am**	**31/8/2026 :17.00pm**

टिपः-

1) सर्व पात्र/ इच्छुक लिलावधारकांनी लिलाव प्रक्रियेत भाग घेणेसाठी https://www.eauction.gov.in या संकेतस्थळावर enrolled होणे आवश्यक आहे व लिलावपत्रक धुळे मनपाचे सबपोर्टलवर उपलब्ध आहे.उक्त लिलावाबाबत अडचणी/माहितीकरिता टोलफ्री क्रमांक **Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002, 0120-4001005,0120-6277787** यांचेशी / धुळे मनपा 02562-288301 याक्रमांकावर संपर्क साधावा. पात्रता मिळविणेसाठी आवश्यक दस्तऐवजांची ऑनलाईन पुर्तता करावी लागेल.

2) लिलावधारकांनी **बयाणा रक्कम व लिलाव संचाचे शुल्क हे मा. आयुक्त, धुळे महानगरपालिका यांचे नावे असलेला** राष्ट्रीयकृत बँकेकडील D.D. द्वारे **पध्दतीने मनपाच्या** बाजार विभागाकडेस लिलाव फॉर्म मध्ये दर्शविलेलया विहीत कालावधीत व वेळेत जमा करणे **आवश्यक आहे.**

3) लिलावधारकांनी लिलावातील सर्व मुळदस्तऐवज **स्कॅन करुन** ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील, अन्यथा ई-लिलाव प्रक्रियेत त्यांना सहभागी होता येणार नाही.

4) सर्व गाळ्यांना एकत्रित प्रती गाळा रू. 25,000/- बोली अनामत रक्कम राहील. (गाळा न मिळाल्यांस परतावा)

5) **केवळ पात्र लिलावदारांना या लाईव्ह ई ऑक्शन मध्ये सहभागी होता येईल याची नोंद घ्यावी.**

6) तांत्रिक कागदपत्रे उघडण्याचे दिवशी मुळ कागदपत्रे किंवा मनपास आवश्यक असेल त्या दिवशी सादर करणे आवश्यक आहे. व इतर सुचना लिलाव नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. तसेच सदर बाबत अधिक तपशिलाकरिता निम्न नमुद कार्यालयाकडे इच्छुक लिलावदारांना चौकशी करता येईल.

7) **ज्या लिलावधारकाची लिलाव मंजुर होईल त्यास जीएसटी करप्रणाली लागू आहे व इतर संबंधीच्या अटी व शर्ती निविदा फॉर्ममध्ये नमुद आहेत. शासकीय कर सुध्दा प्रचलीत नियमानुसार भरावयाचे आहे त्या प्रमाणे विचार करुन लिलाव दर सादर करावे.**

8) सदर निविदा कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचे अथवा स्विकारणेचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे.

Sd/-***
सहा. आयुक्त
धुळे महानगरपालिका

जा.क्र./ धुमपा/ बाजार विभाग./ 266 / 2026-27
स्थळ : धुळे दिनांक 28/ 07/ 2026.

धुळे महानगरपालिका

बाजार विभाग

मा. आयुक्त, धुळे महानगरपालिकेमार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील भाजी मार्केट मार्केटमधील गाळा क्र. 1 ते 12, 15 ते 28, 31 ते 44 असे एकुण 40 पैकी निविदा फॉर्म मधील तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविले नुसार एकुण 17 गाळयांकरिता 10 वर्षासाठी भाडेपटटयाने / लिज पध्दतीने द्यावयाचे असुन या गाळयांसाठी सर्वसाधारण व्यक्ती/संस्था लिलावात भाग घेऊ शकते अशा नोंदणीकृत संस्था/ व्यक्तींकडुन ई **लिलाव पध्दतीने (E_Auction) एकत्रित प्रति गाळा दर मागविण्यांत येत आहे.**

- **धुळे महानगरपालिकेकडुन ऑनलाईन डिजीटल साईन ई निविदा मागविण्यांत येत आहेत. सदर निविदा शासनाचे** https://eAuction.gov.in/eAuction/app या संकेतस्थळावर उपलब्ध /(डाऊनलोड) करता येईल.

अटी व शर्ती :

- ई लिलाव प्रक्रियेमध्ये सहभाग घेऊ इच्छीणा-या लिलाव धारकास अथवा अभिकर्ता यांना वरील संकेतस्थळावर जाऊन पात्र होणेसाठी आवश्यक दस्तऐवजाची ऑनलाईन पुर्तता करावी लागेल तसेच 3 गाळे मिळुन 1 गाळा तसेच 2 गाळे मिळुन 1 गाळयाकरिता लिलावात भाग घेण्याकरीता निविदा संचाची फी (लिलावात भाग घेणेकरिता रक्कम रु. 2000/- नॉन रिफंडेबल राष्ट्रीयकृत बॅंकेकडील D.D. स्वरुपात) व **25000/- चा राष्ट्रीयकृत बॅंकेकडील डिमांड ड्राप्ट** द्वारे महानगरपालिकेडेस विहीत कालावधीत व वेळेत जमा करावा लागेल. (गाळा न मिळाल्यांस परतावा)
- तसेच लिलाव फॉर्म मधील लिफाफयामध्ये आवश्यक असलेली सर्व कागदपत्रांची मुळ प्रती स्कॅन करुन संकेतस्थळावरील प्रसिध्दीस दिलेल्या जाहीर लिलाव प्रणालीत अपलोड दिनांक 31-07-2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपासुन दि.20-08-2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अपडलोड करणे आवश्यक राहील. विहीत कालावधी नंतर लिलावात भाग घेता येणार नाही. वरील प्रमाणे पुर्तता केल्यावरच लिलावात भाग घेता येईल.
- लिलाव धारकांनी 7,773/- या रक्कमेच्या पुढे कमीत कमी रु. 10,000/- च्या पुढ बोली वाढवावी./ बोलावी लागेल.
- केवळ पात्र लिलाव धारकांना या लाईव्ह ई लिलावामध्ये सहभागी होता येईल. सदर ई लिालावाबाबत अधिक माहीतीसाठी धुळे महानगरपालिकेच्या बाजार विभागात चौकशी करता येईल.
- अनामत रक्कम (Premium) गाळा मंजुरीनंतर 7 दिवसांचे आत भरणे बंधनकारक राहील.

2 : लिलाव धारकाने लिफाफा नं. 1 :- तांत्रिक लिलाव प्रक्रियेत सहभागाकरिता आवश्यक असलेले (कागदपत्रे) यामध्ये लिफाफा क्र. 1 मध्ये लिलावधारकाने ऑनलाईन पध्दतीने मुळ कागदपत्रे स्कॅन करुन समाविष्ठ करावयाची आहेत.

1) **ई ऑक्शन फी सर्व भाग घेणारे लिलावधारकांना 3 गाळे मिळुन 1 गाळा तसेच 2 गाळे मिळुन 1 गाळयाकरिता रू. 2000 (GST सह) ई ऑक्शन बयाणा रक्कम (EMD) (एकुण ना-परतावा (अनामत)** (Premium) **रकमेच्या उक्त रकमेच्या निविदेत दर्शविलेल्या तक्त्यानुसार रकमेचा म्हणजे 25000/- हया रक्कमेचा डी.डी**) **राष्ट्रीयकृत बॅंकेकडील Demand Draft द्वारे मा. आयुक्त, धुळे महानगरपालिका यांचे नावे असलेला व विहीत कालावधीतील असलेला असावा. स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक राहिल.**
2) **ज्या नावाने गाळा घ्यावयाचा आहे त्या व्यक्तीचे/ संस्थेचे पॅन कार्ड/ टॅन कार्ड तसेच आधार कार्ड अपलोड करणे.**
3) **आरक्षणातील गाळयांसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे जसे. संबंधीत व्यक्तीचे जाती निहाय - जात प्रमाणपत्र, दिव्यांग व्यक्तींनी मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील तसेच शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याचे ऑनलाईन प्रमाणपत्र किमान 40% असे सोबत जोडणे अनिवार्य राहील.**

4) सुवर्ण जयंती महिला बचत गट असल्यास त्याचे तसेच सक्षम शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

5) सफाई कामगारांचे आश्रितासाठी लाड पागे समितीचे शिफारशीनुसार मान्यता प्राप्त यादीतील नावे असणारे.

6) आपदग्रस्त महिलांसाठी शासनाकडील आपदग्रस्त असल्याचे पुर्नवसन विभागातील सक्षम प्राधिकृत केलेल्या अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

7) बेरोजगार संस्था असल्यास शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे त्याबाबतचे प्रमाणपत्र व मागील 03 वर्षाचा ऑडिट अहवालाची प्रत अपलोड करावी.

8) आरक्षणतील गाळयाकरिता लिलावधारक हा धुळे शहराचा रहिवासी असल्याचे सक्षम प्राधिकृत केलेल्या अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अनारक्षित गाळयांसाठी कोणताही व्यक्ती/संस्था लिलावात भाग घेऊ शकते.

9) लिलावधारकाने ई ऑकशन मध्ये गाळेकरिता सादर केलेली रक्कम (H1) भरल्यानंतर उर्वरित रक्कम भरल्यास नकार दिला / किंवा तांत्रिक चुक केली तरी देखील निविदा फी व बयाणा रक्कम जप्त करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 439 मध्ये नमुद तरतुदीनुसार मालमत्ता कराची थकीत रक्कम म्हणुन सदर गाळयांची संपुर्ण रक्कम वसुल करणेत येईल.

धुळे महानगरपालिका

विषय :- मा. आयुक्त, धुळे महानगरपांलिकेमार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील भाजी मार्केट मार्केटमधील गाळा क्र. 1 ते 12, 15 ते 28, 31 ते 44 असे एकुण 40 पैकी निविदा फॉर्म मधील तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविले नुसार एकुण 17 गाळयांकरिता 10 वर्षासाठी भाडेपटटयाने / लिज पध्दतीने द्यावयाचे असुन या गाळयांसाठी सर्वसाधारण व्यक्ती/संस्था लिलावात भाग घेऊ शकते अशा नोंदणीकृत संस्था/ व्यक्तींकडुन ई लिलाव पध्दतीने (E_Auction) एकत्रित प्रति गाळा दर मागविण्यांत येत आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील भाजी मार्केट मधील गाळा क्र. 1 ते 12, 15 ते 28, 31 ते 44 असे एकुण 40 गाळे 3 गाळे मिळुन 1 तसेच 2 गाळे मिळुन 1 गाळा असे एकत्रित प्रति गाळा बाबतची सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :-

तक्ता क्र. 1

अ. क्र.	एकुण दर्शविलेले एकत्रित गाळा क्र.	एकत्रित क्षेत्रफळ (रेडिरेकनर दर 204 प्रती चौ.मी. महिना)	गाळा एकत्रित एकुण वार्षिक भाडे	एकुण एकत्रित 3 महिन्याचे भाडे रक्कम अनामत रक्कम ना परतावा	आरक्षण
1	31,32	12.7	31090/-	7,773/-	सर्वसाधारण

निविदा अटी व शर्ती

1. ऑनलाईन ई ऑक्शन प्रणालीमध्ये सहभाग घेणेकामी उपरोक्त तक्त्यात दर्शविले प्रमाणे निविदा संचाची फी गाळयाकरिता रु.2000/- (विना परतावा) या रक्कमेचा D.D. राष्ट्रीयकृत बँकेचा (Demand Draft) व निविदा बोली रक्कम एकत्रित गाळ्यांसाठी रू. 25000/- **मात्रचा D.D.** राष्ट्रीयकृत बँकेचा (Demand Draft) स्वरूपात भरणे आवश्यक आहे. (ऑनलाईन पध्दतीने लिफाफा क्र. 01 मध्ये तांत्रिक लिफाफा यादीमध्ये दोन्ही डी.डी. स्कॅन करुन अपलोड करणे) तसेच निविदेचा सबमिशन झाल्यानंतर दि. 20-08-2026 रोजी सकाळी 11.00 ते 05.00 वाजेपर्यंत इकडील कार्यालयाकडेस Envelope No.1 कागदपत्रांसह दोन्ही डी. डी. / निविदा संच फी व बयाणा रक्कम जमा करणे बंधनकारक राहील.
2. निविदेत / ई ऑक्शन करिता सहभागी होणेकामी लिलावधारकांनी / निविदाधारकांनी Online पध्दतीने शासनाचे संकेतस्थळ https://eauction.gov.in येथे दि. 31/ 07/2026 रोजी सकाळी 11.00 ते दि.20- 08- 2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यत Online पध्दतीने स्विकारले जातील. यावेळेनंतर आलेल्या निविदेचा विचार करता येणार नाही तसेच ज्यांचे निविदा दर मंजुर होईल त्यातुन ना परतावा अनामत (Premium) रक्कम वजा करून उर्वरित रक्कम 7 दिवसांचे आत त्वरित भरावी लागेल. सदर रक्कम न भरल्यास सहभागी होणेकरिता भरलेली बोली अनामत (Premium) रक्कम जप्त केली जाईल व म.न.पा. अधिनियमातील कलम 439 मधील तरतुदीनुसार कारवाई होईल. सदर गाळयाचा फेर निविदा काढण्यांत येईल
3. संपुर्ण अनामत (Premium) रक्कम भरल्याशिवाय करारनामा केला जाणार नाही तसेच गाळा ताबा देखील दिला जाणार नाही.
4. दुकान भाडेने घेतलेल्या दुकानाची मालकी सर्वस्वी महानगरपालिकेची असुन् दुकानाचे भाडेपट्टेधारकांस पट्टयाचे हक्क दुकान भाडेपट्टेधारकांस कोणासही तबदील करून देता येणार नाही अगर दुकानाचा काही भाग पोटभाडयाने वगैरे अन्य त-हेने देता येणार नाही.

5. गाळयासाठी नमुद केलेल्या प्रति चौरस मिटर प्रति महिना भाडे महानगरपालिकेकडे महिन्याचे 5 तारखेपर्यत भरणे बंधनकारक राहिल. भाडयाची रक्कम विहित तारखेस न भरल्यास रक्कम भरण्याचे तारखेपर्यत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी / व भाडे हस्तांतरण अधिनियम 2023 मधील तरतुदी प्रमाणे व्याज भरावे लागेल. भाडे भरणेबाबतची पुर्वसुचना देणे महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही.

6. दुकाने देणेची कराराची मुदत ही (10) वर्षाची राहिल. वेळोवेळी भाडे हस्तांतरण अधिनियम 2023 / शासन निर्देशानुसार व शिफारशी नुसार ठरविलेले भाडे आकारण्यांत येईल.

7. दर 3 वर्षांनी चालु वर्षाच्या भाडे रकमेवर 5 % भाडेवाढ राहील.

8. भाडेपट्टेधारकांस महाराष्ट्र शासनाचे कर व महानगरपालिका मालमत्ता कर व फी वगैरे असे सर्व कर व फी भरावी लागेल.

9. भोगवटाधारकांस सदर जागेत विद्युत पुरवठा करणेसाठी इलेक्ट्रीक मीटर त्याचे स्वखर्चाने घ्यावे लागेल. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडुन मागणी करण्यांत आलेली रक्कम व येणारे विद्युत बील भाडेपट्टेधारकांस भरावे लागेल. विद्युत पुरवठा करण्यासंबंधी येणाऱ्या खर्चाचा कोणत्याही प्रकारचा भाग महानगरपालिकेकरुन दिला जाणार नाही. लाईट मिटर घेण्यासाठी ना - हरकत प्रमाणपत्र हे देखील म.न.पा.ने ठरवुन दिलेले भाडेकरू यांचेच नावाने घेता येईल् तसेच इतर मुलभुत सुविधा पाणी, स्वच्छता इ. स्वखर्चाने करून घ्याव्यात, दुसऱ्या नावाने दिले जाणार नाही.

10. दुकान भाडेपट्टेधारक यास भाडयाने दिलेल्या दुकानात कोणत्याही प्रकारचा फेरफार अगर कोणत्याही प्रकारचे जादा बांधकाम (ॲडिशनल ॲण्ड अल्टरेशन) दुकानाच्या कोणत्याही भागात किंवा दुकानाबाहेरील परिसरात करता येणार नाही. तसे दुकान भाडेपट्टेधारक यांनी केल्यास व महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यास सदर भाडेपट्टेधारक यांचा भाडयाचा करार रद्द करून त्यांनी भरलेली ना परतावा प्रिमियम रक्कम महानगरपालिका निधीमध्ये जमा करून दुकान महानगरपालिका ताब्यात घेईल व परत सदरचे दुकान महानगरपालिका योग्य त्या पध्दतीने भाडेपट्ट्याने देईल. अशा वेळेस मुळ भाडेपट्टेधारकांस दुकान भाडयाने देण्याचे प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. दुकानाचे कमी भाडे नुकसानीस पुर्वीच्या भाडेपट्टेधारकांची जबाबदारी राहिल

11. दुकानांची वेळोवेळी साफसफाई करणे, रंग देणे व इतर किरकोळ दुरूस्तीसारखी कामे भाडेपट्टेधारकांस स्वखर्चाने करावी लागतील त्यासाठी येणा-या खर्चास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही मात्र असे कोणतेही काम करावयाचे झाल्यास त्याबद्दल महानगरपालिकेची लेखी संमती घेतल्याशिवाय असे कोणतेही काम करता येणार नाही.

12. भाडेपट्टेने घेतलेल्या दुकानांची कोणत्याही प्रकारची नासधुस, तोडफोड अगर भिंती पाडण्याचे व दुकानाचे क्षेत्रफळ वाढविण्याचे काम भाडेपट्टेधारकांस करता येणार नाही असे केल्यास त्यास भाडेपट्टेधारक सर्वस्वी जबाबदार राहिल व त्याबाबत महानगरपालिका ठरविल ती नुकसान भरपाई यास त्वरित भरावी लागेल.

13. भाडेपट्टेधारकाने दिलेल्या दुकानात धोक्याचे अगर ज्वालाग्राही तसेच स्फोटक पदार्थ त्याचप्रमाणे दारूबंदी कायद्याखाली येणा-या कोणत्याही वस्तुंचा साठा भाडेपट्टेधारकांस करता येणार नाही याविरूध्द भाडेपट्टेधारक यांनी वर्तन केल्यास होणा-या परिणामांस व नुकसानीस भाडेपट्टेधारक हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

14. महानगरपालिकेस कोणत्याही गाळयाची आवश्यकता वाटल्यास याबाबत महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व भाडे हस्तांतरण अधिनियम 2023 नुसार गठीत समिती निर्णय घेईल तो भाडेपट्टेधारकांवर बंधनकारक असेल

15. भाडेपट्टेधारक यांच्या दुकानाची मुदत ज्या तारखेस संपेल त्याच तारखेस भाडेकरू यांस महानगरपालिकेकडुन दुकान ज्या स्थितीत ताब्यात मिळाले होते त्याच स्थितीत

महानगरपालिकेच्या ताब्यात द्यावे लागेल. भाडेपट्टा करार संपताच दुकान भाडेपट्टेधारक यांनी ताब्यात न दिल्यास महानगरपालिका दुकानातील सामान बाहेर काढुन दुकानांचा कब्जा घेईल. अशाप्रकारे दुकान खाली करून घेण्याचा सर्व खर्च दुकान भाडेपट्टेधारकांस महानगरपालिकेला द्यावा लागेल. त्याचप्रमाणे दुकान खाली करून घेतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही. अगर अशी नुकसान भरपाई मागण्याचा भाडेपट्टेधारकांस यास कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. महानगरपालिकेने अशाप्रकारे दुकान खाली करून घेतल्यास त्याविरूध्द कोणत्याही प्रकारची हरकत घेण्याचा अगर कोणतीही कायदेशीर कारवाई करण्याचा भाडेपट्टेधारकांस हक्क राहणार नाही. याप्रमाणे भाडेपट्टेधारक यांनी केल्यास तो रद्द समजण्यांत येईल.

16. भाडेपट्टा कराराच्या पुर्ण मुदतीच्या अगोदर जर भाडेपट्टेधारकाने दुकान त्यांच्या स्वखुशीने सोडुन देऊन ताबा महानगरपालिकेस दिल्यास महानगरपालिका सदर दुकानाचा फेर जाहिर लिलाव करील, अशा लिलावास जर महानगरपालिकेस राहिलेल्या मुदतीसाठी पुर्वीपेक्षा कमी भाडयाची बोली आल्यास महानगरपालिकेस होणारे नुकसान पहिल्या भाडेपट्टेधारकाकडुन वसुल केले जाईल. (सुरक्षा अनामत रकतेतुन जप्त करणेत येईल)

17. बाजार विभाग संबंधीचे उपविधी भाडेपट्टेधारक यांच्यावर बंधनकारक राहतील. तसेच पुढे वेळोवेळी जे बाजाराचे नियम व तपासणीचे नियम दुरूस्त होतील ते भाडेपट्टेधारक यांच्यावर बंधनकारक राहतील, त्यांचे उल्लंघन करता येणार नाही. इत:परही भाडेपट्टेधारक यांनी उल्लंघन केल्यास कायदेशीररित्या होणा-या परिणामांस भाडेपट्टेधारक सर्वस्वी जबाबदार राहील.

18. शर्तीप्रमाणे योग्य स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने म. जिल्हा निबंधक यांचेकडुन योग्य त्या मुल्याच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल व इतर जरूर त्या अटींची पुर्तता केल्याशिवाय दुकान भाडेपट्टेधारक यांस दुकानाचा कब्जा दिला जाणार नाही

19. सदर दुकानात ज्या मालाची दुर्गंधी येते तसेच पर्यावरण किंवा नागरिकांचे आरोग्य धोक्यांत येईल अशा मालाचा साठा करून विक्री करण्यांस सक्त मनाई आहे.

20. संबंधीत दुकानाचे भाडे व हिशोब वगैरे बद्दल मा. लेखा परिक्षण अहवालात आक्षेप घेतल्यास व त्यामुळे काही रक्कम वसुल करणे क्रमप्राप्त झाल्यास त्या सरकारी लेखा परिक्षण अहवाल दुकान भाडेपट्टेधारकावर बंधनकारक राहिल. याप्रमाणे लेखा आक्षेप निघुन काही थकबाकी निघाल्यास व तसे महानगरपालिकेने लेखी कळविल्यांस 15 दिवसांत रक्कम भरून तशी पावती घेण्याची जबाबदारी दुकान भाडेपट्टेधारकाची रहिल.

21. ना परतावा प्रिमियमची रक्कम सदर दुकानाची कराराप्रमाणे मुदत संपेपर्यत दुकान भाडेपट्टेधारक यांच्याकडेस येणे असलेल्या अन्य कोणत्याही रकमेपोटी जमा केले जाणार नाही. सदर रकमेवर कोणत्याही प्रकारे व्याज मिळणार नाही अथवा ना परतावा प्रिमियम रक्कम कुठल्याही सबबीवर परत मिळणार नाही. न्यायालयात दाद मागता येणार नाही.

22. महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 139 प्रमाणे महानगरपालिकेची मालमत्ता भाडेपट्ट्याने घेणाऱ्यावर मालमत्ता कर व इतर महानगरपालिका कर देण्याचे बंधनकारक राहिल व त्यास एकत्रित कर वगैरे दरवर्षी नियमित भरावा लागेल.

23. भाडेपट्टयांचे मुदतीत भाडेपट्टाधारक मरण पावल्यास त्याचे कायदेशीर वारसांना आपले नाव उर्वरित मुदतीकरिता उपायुक्त यांचे लेखी पुर्व परवानगीने लावुन घेता येईल मात्र त्यासाठी हस्तांतरण फी बाबत <u>भाडे हस्तांतरण अधिनियम 2023 मधील गठीत समिती वेळोवेळी निश्चित करेल त्याप्रमाणे मात्र महानगरपालिकेकडे भरावी लागेल.</u>

24. वर दिलेल्या शर्ती व अटीतील कोणत्याही अटी व शर्ती यांचा भाडेपट्टाधारकाकडुन भंग झाल्यास भाडेपट्टाधारकाने घेतलेल्या दुकानांचे भाडेपट्टा करार रद्द करून दुकान ताबडतोब खाली करून घेण्याचा महानगरपालिकेस पुर्ण हक्क आहे. करार रद्द झाल्याबरोबर दुकान खाली न केल्यास

शर्त क्र. 15 मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुकान ताब्यात घेण्याची तजवीज करण्याचा पुर्ण अधिकार महानगरपालिकेस आहे व राहील.

25. सदरची दुकाने महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 व त्याखाली तयार केलेले पोटनियमानुसार देण्यांत येतील.

26. शासनाने वेळोवेळी लागु केलेले G.S.T. व ईतर कर नियमाने भरणे बंधनकारक आहे.

27. महानगरपालिकेस योग्य वाटेल अशी अट भाडेपट्टा कालावधीत व भोगवटा कालावधीत करारनाम्यामध्ये समाविष्ट करणचा हक्क मनपाने राखुन ठेवला आहे.

28. महानगरपालिकेने वरिलप्रमाणे मंजुर केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याचा स्वःखर्चाने दुय्यम निबंध कार्यालय यांचे अभिप्रायानुसार योग्य त्या रकमेचे स्टॅम्प पेररवर करारनामा करून द्यावा लागेल.

29. वरील अटी शर्तीचे दुकान भाडेपट्टाधारकाने पालन न केल्यास अगर तिचा भंग केल्यास दुकान जप्त व ताब्यात घेण्याचा महानगरपालिकेस अधिकार आहे.

30. भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण सुधारित अधिनियम 2023 नुसार गठीत समिती किंवा वेळोवेळी शासनाचे राजपत्र अधिसुचनेनुसार, म.न.पा. ठराव, मे. न्यायालय यांचे आदेशाचे पालन भाडेपट्टाधारकावर बंधनकारक राहिल.

Sd/-xxx

उपायुक्त
धुळे महानगरपालिका, धुळे